# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.07.2025** **वारःसोमवार**

---

1. ऑपरेशन सिंदूरमधील उल्लेखनीय कामगिरीमुळं ब्रह्मोस क्षेपणास्त्राची जागतिक स्तरावर वाढती मागणी
2. आठ खलिस्तानी दहशतवाद्यांना अमेरिकेत FBI कडून अटक
3. विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत इटलीच्या यानिक सिन्नरची बाजी आणि
4. अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेत भारताला विजयाची संधी,

**राजनाथ ब्रह्मोस**

ऑपरेशन सिंदूरमध्ये ब्रह्मोस क्षेपणास्त्राच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे, जगभरात ब्रह्मोस क्षेपणास्त्राची मागणी वाढली असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी काल सांगितलं. लखनौ इथं उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री चंद्र भानू गुप्ता यांच्या पुतळ्याचं अनावरण सिंग यांच्या हस्त झालं त्यावेळी ते बोलत होते. जगभरातल्या 14 देशांनी याविषयी चौकशी केल्याचे सांगून, लखनौ इथून आता क्षेपणास्त्राची निर्यात होऊ शकेल ज्यामुळे रोजगारवाढीस मदत होईल असेही ते यावेळी म्हणाले.

**जीएसटी संकलन**

देशातील एकूण प्रत्यक्ष कर संकलनात गेल्या दहा वर्षांत 274 टक्के वृद्धी नोंदवली गेली आहे. अर्थ मंत्रालयाच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 2013-14 आणि 2024-25 या दहा वर्षांच्या काळात, कर विभागाने जारी केलेल्या परताव्यात 474 टक्क्यांनी वाढ झाली आहे, तर करपरतावा दाखल करणाऱ्या करदात्यांमध्येही 133 टक्के वाढ झाली आहे. डिजीटल पायाभूत सुविधांचा अवलंब केल्यामुळे कर प्रशासनातील परिवर्तन दिसून आल्याचंही विभागानं नमूद केलं आहे.

**विदेशी गुंतवणूकदार**

11 जुलैला संपलेल्या आठवड्यात भारतीय रोखे बाजारात विदेशी गुंतवणूकदारांनी अंदाजे चार हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. एप्रिल, मे आणि जून महिन्यात रोख्यांच्या खरेदीमुळे त्यात भर पडली. अमेरिकेच्या निर्यात शुल्क धोरणामुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चिततेचे वातावरण असूनही भारतीय शेअर बाजारात मोठी परकीय गुंतवणूक झाल्याचे दिसून येत आहे.

**रेल्वे सीसीटीव्ही**

प्रवाशांची सुरक्षितता वाढवण्यासाठी रेल्वेनं सर्व डब्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सर्व 74 हजार कोच आणि 15 हजार लोकोमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यास मान्यता दिली आहे. प्रत्येक रेल्वे कोचमध्ये चार डोम प्रकारचे सीसीटीव्ही कॅमेरे असतील आणि प्रत्येक लोकोमोटिवमध्ये सहा सीसीटीव्ही कॅमेरे असतील. 100 किलोमीटर प्रति तास वेगानं धावणाऱ्या आणि कमी प्रकाशात धावणाऱ्या रेल्वे गाड्यांसाठी देखील उच्च दर्जाचे फुटेज उपलब्ध असावं याची खात्री करण्याचं आवाहनही त्यांनी रेल्वे अधिकाऱ्यांना केलं आहे.

**बनावट खते कारवाई**

बनावट आणि निकृष्ट दर्जाच्या खतांविरुद्ध तत्काळ आणि कठोर कारवाई करण्याचे निर्देश केंद्रानं दिले आहेत. केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी याबाबत देशातील सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिलं आहे. बनावट खतांची विक्री,

खतांचा काळाबाजार यासारख्या बेकायदेशीर कृत्यांना आळा घालण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना योग्य वेळी आणि परवडणाऱ्या किमतीत दर्जेदार खतांचा पुरवठा करणं आवश्यक आहे, असं शिवराज सिंह चौहान म्हणाले.

**नड्डा-सौदी**

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री तीन दिवसांचा सौदी अरेबिया दौरा संपवून भारतात परतले. 11 ते 13 जुलै दरम्यान दिलेल्या भेटीत, खतपुरवठा साखळी मजबूत करणारे आणि आरोग्य आणि औषधनिर्माण क्षेत्रात द्वीपक्षीय सहकार्य बळकट करणारे महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. सौदी अरेबियाचे उद्योग आणि खनिज संसाधन मंत्री बंदर बिन इब्राहिम अल खोरायेफ यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर दोन्ही मंत्र्यांनी मादेन तसेच आयपीएल, क्रिभको आणि सीआयएल या भारतीय कंपन्यादरम्यान दीर्घकालीन करारांवर स्वाक्षरी केली. या करारांमुळे डायमोनियम फॉस्फेट खताच्या पुरवठ्यात या वर्षापासून पुढील पाच वर्षांसाठी दरवर्षी 3 दशलक्ष मेट्रिक टन वाढ होईल. परस्पर संमतीने कराराच्या मुदतीत आणखी वाढही करता येणार आहे.

**खलिस्तानी अटक**

अमेरिकेत, फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशननं मोठी कारवाई करत देशभरातून आठ खलिस्तानी दहशतवाद्यांना अटक केली आहे. यामध्ये पंजाबमधील पवित्तर सिंग बटाला हा बंदी घातलेल्या बब्बर खालसा इंटरनॅशनलशी संबंधित दहशतवाद्याचाही समावेश आहे. या कारवाई दरम्यान एफबीआयनं बंदुका, दारूगोळा आणि रोख रक्कम देखील जप्त केली. भारतीय गुप्तचर यंत्रणेनुसार, हे सर्व संशयित आंतरराष्ट्रीय दहशतवादी जाळ्याचा भाग आहेत. त्यांच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.

**ऑक्सिऑम 4**

भारतीय अवकाशयात्री ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्लांसह ऑक्सिओम-4 मोहिमेतील तीन सहकाऱ्यांच्या परतीचा प्रवास आजपासून सुरू होत आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता यानाच्या अनडॉकिंगचं नियोजन करण्यात आलं असून, उद्या मंगळवारी दुपारी तीन वाजता हे अंतराळवीर पृथ्वीवर परत येतील अशी माहिती विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री जितेंद्र सिंह यांनी दिली आहे. त्यानंतर पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षणाशी जुळवून घेण्यासाठी शुक्ला इतर सहकाऱ्यांसह फ्लाईट सर्जनच्या देखरेखीखाली सात दिवसांच्या पुनर्वसन कार्यक्रमामध्ये सहभागी होतील. या मोहिमेअंतर्गत 14 दिवस शुक्ला यांनी आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात मुक्काम केला त्यामध्ये भारतासाठी विशेष सात प्रयोग केले आहेत.

**जयशंकर चीन**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून दोन दिवसांच्या चीन दौऱ्यावर रवाना होत आहेत. शांघाय सहकार्य संघटनेतील 10 सदस्य देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या आज होणाऱ्या बैठकीला ते उपस्थित राहातील. या बैठकीत विविध क्षेत्रातल्या महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय आणि प्रादेशिक मुद्द्यांवर चर्चा होणार आहे. त्याशिवाय जयशंकर या देशांच्या नेत्यांशी द्वीपक्षीय बैठका घेतील. तसेच चीनचे समपदस्थ वांग यी यांचीही भेट घेण्याची शक्यता आहे.

**युरोप निर्यात शुल्क**

युरोपने अमेरिकन वस्तूंवर लावलेले प्रत्युत्तरात्मक आयात शुल्क स्थगित करण्याचा निर्णय घेतल्यामुळे या महिन्याअखेर उभय देशांदरम्यान व्यापार करार होण्याची शक्यता आहे. माध्यम प्रतिनिधींशी बोलताना युरोपियन आयोगाच्या अध्यक्ष उर्सुला लेयन यांनी एक ऑगस्टपासून युरोपियन युनियन आणि मेक्सिकोमधील वस्तूंवर 30 टक्के नवीन शुल्क लागू करण्याचा निर्णय घेतला असल्याने आता वाटाघाटी करण्याची वेळ आल्याचं बातमीदारांशी बोलताना सांगितलं. युरोपियन युनियन आपल्या 27 सदस्य देशांच्या वतीने व्यापार करारांवर वाटाघाटी करणार आहे.

**राष्ट्रपती-ओडिशा दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून ओडिशाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात त्या भुवनेश्वर इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्सच्या पाचव्या दीक्षांत समारंभाला उपस्थित राहतील. तसंच उद्या (मंगळवारी) रेवेनशॉ विद्यापीठाच्या 13 व्या वार्षिक दीक्षांत समारंभाला राष्ट्रपती मुर्मू उपस्थित राहतील, यावेळी त्यांच्या हस्ते रेवेनशॉ गर्ल्स हायस्कूलच्या तीन इमारतींच्या

पुनर्विकासाची पायाभरणी करण्यात येणार आहे. याशिवाय कटक इथं आदिकबी सरला दास यांच्या जयंती समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार  असून 2024 चा कलिंग रत्न पुरस्कार प्रदान सोहळा त्यांच्या हस्ते होणार आहे.

**पोलिस-अमली पदार्थ**

नवी मुंबईतल्या रबाले इथं पोलिसांनी छापा टाकून एमडी पावडर वजन काटा आणि अडीचशे प्लास्टिक पिशव्या असा साठा जप्त केला. तसंच चार जणांना अटकही केली. हे चारही जण ऐरोलीचे रहिवासी आहेत. एका महिलेनं आपल्या जावयाच्या मदतीनं बेकायदेशीर अमली पदार्थ व्यवहार सुरू केल्याची माहिती मिळाल्यानंतर तीन पोलिस अधिकाऱ्यांसह मोठ्या फौजफाट्यासह कारवाई केली आहे.

**बास्केटबॉल**

भारतीय बास्केटबॉल संघानं काल चीनच्या प्रजासत्ताकातील शेंझेन बे स्पोर्ट्स सेंटरमध्ये फिबा महिला आशियाई कप 2025 मधील ब विभागातील गट अच्या उद्घाटन सामन्यात कझाकिस्तानचा 85-68 गुणांन पराभव केला आणि विजेतेपद मिळवलं. भारताची पुष्पा सेंथिल कुमारनं 23 गुणांसह सामन्यात सर्वाधिक गुण मिळवले आणि सत्य कृष्णमूर्ति आणि श्रीकला राणीने 15 गुणांसह तिला चांगली साथ दिली. गेल्या चार वर्षांत अमेरिकेच्या फिबा आशियाई कपमध्ये भारतीय महिला बास्केटबॉल संघाचं हे पहिलंच पदार्पण होतं.

**विम्बलडन**

विम्बल्डन टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत काल रात्री उशीरा संपलेल्या सामन्यात, यानिक सिन्नरने बाजी मारली आहे. तीन तास चार मिनिटे सुरू असलेल्या या थरारक सामन्यात सिन्नरने गतविजेत्या कार्लोस अल्कराझचा 4-6, 6-4, 6-4, 6-4 असा पराभव केला. विम्बल्डन स्पर्धेच्या 148 वर्षांच्या इतिहासात सिन्नर पहिलाच इटालियन विम्बल्डन विजेता आहे.

**क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या अँडरसन-तेंडुलकर कसोटी क्रिकेट मालिकेतला तिसरा सामना जिंकण्याची भारताला संधी असली तरी दुसऱ्या डावात 4 बाद 58 अशी पडझड झाली आहे. लॉर्ड्सवर सुरू असलेल्या सामन्यात इंग्लडचा दुसरा डाव 192 धावांवर संपुष्टात आला. फिरकीपटू वॉशिंग्टन सुंदरने सर्वाधिक 4 बळी घेतले. जसप्रीत बुमराह आणि मोहम्मद सिराज यांनी प्रत्येकी 2 बळी घेतले. भारताला विजयासाठी आणखी 135 धावांची आवश्यकता आहे. आज सामन्याचा अखेरचा दिवस आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.